अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:- अतिमआ/साप्रवि/आस्था/ ६४७९
दिनांक :- १५/१२/२०२०

## -: आदेश :-

विषय :- श्री. गणेश सोनुने, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय यांचे रजा कालावधीत त्यांचे पदाचे कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ :- १) बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय जा.क्र.४५७८, दि.२६/११/२०२०.

२) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/४४९, दि. ११/१२/२०२०.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील श्री. गणेश सोनुने, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय हे दि. २६/११/२०२० रोजीपासून वैद्यकीय कारणास्तव रजेवर आहेत. सदर रजेस संदर्भ क्र. २ च्या ठरावान्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

श्री. गणेश सोनुने यांचे रजा कालावधीत त्यांचेकडील आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदाचा अतिरिक्त पदभार किशोरी शिंदे यांचेकडे तसेच, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय या पदाचा अतिरिक्त पदभार किशोरी शिंदे यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

उपरोक्त अधिकारी यांनी त्यांचे पदाचे कामकाज सांभाळून वरीलप्रमाणे अतिरिक्त कामकाज करावयाचे आहे.

उपरोक्त अधिकारी यांनी वरीलप्रमाणे अतिरिक्त पदभार स्विकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

Rubal 15/12

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :- खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी . . .